# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २८/०९/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूध गुन्हा नोंद

**१) पो.स्टे. जलालखेडा** :– अंतर्गत १३ कि.मी अंतरावर मौजा मेंढला येथे दिनांक २७/०९/२०२२ चे १५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ.जया दिपक ठाकरे, वय ३५ वर्ष, रा.मेंढला वार्ड क्र ०३, ता.नरखेड जि.नागपुर यांचे आरोपी क्र. १) दिनेश गुलाबराव ठाकरे, वय ३८ वर्ष, २) गणेश गुलाबराव ठाकरे, वय ३३ वर्ष हे सख्खे दिर असुन आरोपी क्र. ३) लक्ष्मीबाई गुलाबराव ठाकरे, वय ६० वर्ष, सर्व रा.मेंढला ता.नरखेड जि.नागपुर ही सासु आहे. फिर्यादीचे पती तसेच आरोपी यांचे घराचे रस्त्यावरून, शेतीवरून वादविवाद सुरू असून आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे घरासमोर जाऊन आरोपी क्र. १ याने विळयाने फिर्यादीचे पतीचे डोक्यावर मारले. तेव्हा फिर्यादी मध्यस्थी करीता गेली असता आरोपी क्र. २ गणेश याने फिर्यादीचे कपाळावर दगड मारला तसेच पुन्हा त्यांनी विळयाच्या मुठेने फिर्यादीचे पतीच्या दोन्ही हातावर मारहाण केली. तसेच आरोपी क्र. ३ हिने आरोपी क्र. १ व २ यांना फिर्यादी व फिर्यादीच्या पतीस मारहाण करण्यास भडकाविले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी मनोज चौधरी मो.नं. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. जलालखेडा** :– अंतर्गत १३ कि.मी अंतरावर मौजा मेंढला येथे दिनांक १७/०९/२२ चे १५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिनेश गुलाबराव ठाकरे, वय ४५ वर्ष, रा. मेंढला त. नरखेड याचे आरोपी क्र. १) दिपक गुलाबराव ठाकरे वय ४५ वर्ष हा सख्खा भाउ असुन आरोपी क्र. २) सौ. जया दिपक ठाकरे वय ३५ वर्ष दोन्ही रा. मेढंला हि वहीनी आहे. फिर्यादि व आरोपी यांच्यात घराच्या रस्त्यावरुन शेतीवरुन वादविवाद सुरु आहे. याकारणावरून आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादिच्या घरासमोर जावुन आरोपी क्र. १ यांनी फिर्यादि सोबत त्याचा भाउ गणेश सोबत वादविवाद करुन फिर्यादिचा भाउ गणेश यास तलवारीने डोक्याला मारत असता फिर्यादिने उजव्या हाताने तलवार अडवील्याने फिर्यादिचे उजवे हाताला तसेच फिर्यादीचा भाउ गणेश त्याच्या डोक्याला मागचे बाजुस मारल्याने जखमी होवुन रक्त निघाले व आरोपी क्र. २ हिने विळ्याच्या मुठीने फिर्यादिच्या पायाच्या टोगळ्या जवळ व पाठीवर मारहाण केली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री मनोज शेन्डे हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. मौदा** – अंतर्गत ०४ कि.मी अंतरावरील रिलायन्स कंपनी जवळ डाहाळी येथे दिनांक २७/०९/२२ चे ११.०० वा. ते १६.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– ग.भा पक्षा बळीराम वाघमारे, वय ५७ वर्ष, रा. डाहळी हि व त्यांची मुलगी माया ही एनटीपीसी मध्ये दि २७/०९/२२ रोजी कामाला गेली व नातु राहुल हा कॉलेज मध्ये गेला व फिर्यादी १०.०० वा. मजुरीला घराला कुलुप लाउन गेली. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचा मागचा दार तोडला व घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने आलमारी चा कुलुप तोडुन आलमारीमध्ये ठेवलेले एका डब्यात सोन्याचे दागिने कि १८,०००/–रु. व नगदी ६,०००/–रू. असा एकुण कि. २४,०००/–रु. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेण सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक राजू अंधाळे मो. क्र. ८२०८८७४६६५ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** – अंतर्गत ०७ कि.मी अंतरावरील जुना कामठी रोड गाडेघाट येथे दिनांक १९/०९/२२ चे १८.३० वा. ते दिनांक २०/०९/२२ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– वकील अहमद अली अहमद अंसारी, वय ५५ वर्ष, रा. टेका नाका राय गॅलक्सी २ प्लाट नं ४१६, देवीनगर नागपूर यांनी त्यांच्या जुन्या ले आऊट मध्ये ठेवलेले लोहयाचे सामान सि चॅनल दि. २०/०९/२२ ला स्वताच्या घरी ठेवला होता. सकाळी १०.०० वा. दरम्यान फिर्यादीच्या चोकीदाराचा फोन आला की, ‘आपल्या ले आऊट मध्ये सि चॅनल व लोहयाचे पाईप ज्या मध्ये ६ हेलोजॅन लाईट लागले होते ते कापलेले दिसले’ असे फिर्यादीला माहीत झाल्यावर दि. २०/०९/२२ ला अंदाजे सायंकाळी ०४.०० वा. दरम्यान फिर्यादीचे गाडेघाट ले आऊट मध्ये पोहचुन तेथील लोहयाचे सि चॅनल लोखंडाचे पाईप १२ फुट चे ४४ नग १ नग किमत १,२००/–रू. एकुण ५२,८००/– रू. चा माल तसेच लोखंडाचे ०६ पोल कि. ३,०००/–रू. असा एकुण कि. ५५,८००/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेण सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरून सहारे हे करीत आहे.

**२) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** – अंतर्गत गणे I इंजिनीयरिंग कंपनी येथे दिनांक १०/०९/२२ ते दिनांक २७/०९/२२ दरम्यान फिर्यादी नामे– विनोद गजाननराव पुंडलिक (कंपनी मालक) वय ५३ वर्ष, रा. १७/२० गृहनिर्माण संस्था, शाम नगर सोमलवडा नागपुर यांची प्लॉट क्रं ८/९ एमआयडीसी बोरी येथे गणेश इंजिनियरींग कंपनी असुन अज्ञात आरोपीने त्यांचे कंपनीतिल बाथरूमचे भिंतीला छिद्र पाडुन आतमध्ये प्रवेश केला. यानंतर आरोपीने गोडाउनमध्ये ठेवलेले १) ०२ इंच एम.एस.पाईप २० फुट लांबिचे ०२ नग २) चॅनल ०३ नग ३) ०४ इंची ग्रॅडर ०६ नग ४) ०६ इंची ग्रॅन्डर ०३ नग ५) पाईप कटींग मशिन ०१ नग ६) अतर लोखंडी रॉड २० फुट लांबिचे व पाने पेचिंस असा एकुण किमत अंदाजे १,५०,०००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेण सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार शैलेंद्र नागरे मो क्रं ७७४३९१९८०९ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. पारशिवनी** – अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा तामसवाडी विट भटटा येथे दिनांक २६/०९/२२ चे ००.०० वा. ते दिनांक २७/०९/२२ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अमनदीपसिंग हरदीपसिंग लांबा, वय ५६ वर्ष, रा. २०२, बाब बुदधाजी नगर, टेका नाका नागपुर यांचे मौजा तामसवाडी शिवार येथिल सिमेंट विटाच्या शेडमधिल १) १००–१०० किलो के ०२ लोहे के रोलर कि. ३०,०००/–रू., २) ०२ हेड्रोलीक ट्रॉली कि. २०,०००/–रू. ३) ०३ लोहे की साधी ट्रॉली कि. ६,०००/–रू., ४) ०३ लोहे की डाई का सेट कि. १५,०००/–रू., ५) ४० मिटर का १२० एम.एम का इलेक्ट्रीक केबल कि. ५०,०००/–रू. असा एकुण कि १,२१,०००/–रू.चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेण सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रभाकर झोड मो क्र ८२०८९४३८७४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**